महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(का)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पी.आर-३/सबसिडी/ No 33247 दिनांक : 1 DEC 2012

वाणिज्य परिपत्रक क्र. १८१

**विषय :-** यंत्रमागधारकांना पूरविण्यात येणा-या शासनाच्या सवलतीच्या वीजदरात सुधारणा करणेबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निणय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र. २७/ऊर्जा-३ दिनांक २६/०२/२००८.
२) शासन निणय क्र. टॅरिफ-२००७/प्र.क्र. २७/ऊर्जा-३ दिनांक ३१/०१/२००९.
३) शासन निणय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या विजदर आदेशान्वये विविध वर्गवारीतील वीज ग्राहकांसोबतच यंत्रमागधारक वीज ग्राहकांच्या वीजदरात सुधारणा केलेली आहे. मा. आयोगाने केलेल्या वीजदर वाढीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने यंत्रमागधारक वीज ग्राहकांना देण्यात येणा-या सवलतीच्या वीज दरामध्ये शासन निणय क्र. विपुअ-२०१२/प्र.क्र. ९१/ऊर्जा-३ दिनांक ११/१०/२०१२ अन्वये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे.

१) राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणा-या वीजेच्या दरात सवलत देण्यासाठी शासनाकडून सध्या प्रति युनिट जेवढया रकमेचे अनुदान देण्यात येते त्या मर्यादेपर्यंत अनुदान यापूढेही चालू राहील.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दि. १६ ऑगस्ट २०१२ च्या आदेशामुळे राज्यातील यंत्रमागधारक ग्राहकांच्या वीज दरात माहे ऑगस्ट २०१२ पूर्वीच्या तुलनेत जी वाढ करावी लागणार आहे ती यंत्रमागधारक ग्राहकांनी भरावी.

३) वरील (१) प्रमाणे लागू होणा-या सवलतीच्या दराव्यतिरिक्त (देय असल्यास) इंधन समायोजन आकार किंवा अन्य प्रकारचा दंडात्मक आकार यंत्रमागधारक ग्राहकांनी १०० टक्के भरणे आवश्यक राहील.

शासनाच्या वरील निर्णयामुळे दि. १ ऑगस्ट २०१२ पासून राज्यातील यंत्रमागधारकांना सध्या असलेले सवलतीचे दरच कामय राहतील व नविन दरामुळे स्थिर आकार, वीज आकार व इंधन समायोजन आकार यामध्ये झालेली वाढ ग्राहकास भरावी लागेल.

| अ.क्र | वर्गवारी | स्थिर /मागणी आकार | विज आकार | इंधन समायोजन आकार |
|---|---|---|---|---|
| | | | पैसे प्रति युनिट | पैसे प्रति युनिट |
| | **लघुदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | २७ अ.श. पर्यत जोडभार | रु. ४० प्रति जोडणी प्रति महिना | २८३ | २२ पैसे चे वरील सर्व आकारास व २२ पैसे वा त्या खालील ५०% आकारास लागु |
| २ | २७ अ.श. चे वर जोडभार | रु. ३० प्रति केव्हीए प्रति महिना | २९० | ३० पैसे चे वरील सर्व आकारास व ३० पैसे वा त्या खालील ५०% आकारास लागु |
| . | **उच्चदाब यंत्रमागधारक** | | | |
| १ | एक्सप्रेस फिडरवरील | रु. १३० प्रति केव्हीए प्रति महिना | ४६० | २४ पैसे चे वरील सर्व आकारास व २४ पैसे वा त्या खालील ६०% आकारास लागु |
| २ | नॉन-एक्प्रेस फिडरवरील | रु. १३० प्रति केव्हीए प्रति महिना | ४१३ | २२ पैसे चे वरील सर्व आकारास व २२ पैसे वा त्या खालील ६०% आकारास लागु |

४) वरील प्रमाणे देण्यात येणा-या वीज दरातील सवलतीमुळे महावितरण कंपनीस होणारी महसुलाची नुकसान भरपाई करण्यासाठी आतापर्यंत राज्य शासनाकडून देण्यात येत असलेले अनुदान यापूढेही चालू राहील.

५) सदरचे अनुदान पूर्वी वीज आकार, स्थिर आकार व इंधन समायोजन आकारात मिळत असेल. यंत्रमागधारक ग्राहकांना देण्यात येणा-या स्थिर आकार व वीज आकारातील सवलतीच्या टक्केवारीत अशाप्रकारे सुधारणा करण्यात यावी जेणेकरुन, ऑगस्ट २०१२ पूर्वी लागू असणा-या वीज दराप्रमाणे इंधन समायोजन आकार मिळत असलेल्या अनुदानाची रक्कम सुध्दा विचारात घेऊन ग्राहकास मिळत असलेल्या अनुदानाच्या रकमेत कोणताही बदल होणार नाही.

६) सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दि. १ ऑगस्ट २०१२ पासून करण्यात यावी.

७) वरील सवलतीचे दर पुढील शासन आदेश निर्गमित होईपर्यंत लागू राहतील.

याबाबतीत सर्व क्षेत्रिय कार्यालयांना कळविण्यात येते की, दि. १ ऑगस्ट २०१२ पासून पुढील कालावधीकरिता शासनाच्या सवलतीच्या दरानुसार यंत्रमागधारकांचे वीज देयके वितरीत करण्यात यावीत. या निर्णयापोटी ग्राहकांकडून वसुल करावयाच्या रकमेचे समायोजन पुढील विज देयकात करण्यात यावे.

**सहपत्र : उदाहरणांचे परिशिष्ट**

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत माहितीस रवाना :**

मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान)

-- वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने यंत्रमाग ग्राहकांच्या देयकाच्या संगणक प्रणालीमध्ये आवश्यकते बदल करण्यात यावेत. तसेच वरील निर्णया स्वरुप ग्राहकांकडून वसुल करावयाची रक्कम त्यांचे पुढील विज देयकात समायोजित करण्यात यावी.

**प्रत रवाना :- प्रेषण यादिप्रमाणे**